# <u>गोंधळी</u>

पाहा पाहा हो मंडळी आला आहे हा गोंधळी
ऐका ऐका हो मंडळी सांगे काय हा गोंधळी
जगदंबेचा गोंधळी अंबाबाईचा गोंधळी
अंबा मागे ना जोंधळी मागे भक्ती मायंदळी
सांगतो आहे गोंधळी ||१||

दैत्य माजला महासुर नाव त्याचे महिषासुर
भोळया सांबाकडून महान वरदान मिळवून
मांडी तो अत्याचार सोडले भंडावून त्रिभुवन
वंदूनी शंकरा वधूनी असुरा अंबा चारी धुळी
सांगतो आहे गोंधळी ||२||

त्रासमुक्त भयमुक्त आनंदे नाचती सर्व जन
दर वर्षी नऊ दिवस करीती विजय स्मरण
विजया दशमीला देवीला पुजिती वाटती सोनं
कौतुक भरे पाहे हसूनी लीला बाळांची माऊली
सांगतो आहे गोंधळी ||३||

– नारायण
१०/१७/२३